# <u>महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४.</u>

**विषय** : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) जुलै-ऑगस्ट २०१८ पुरवणी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

# प्र क ट न

---

जुलै-ऑगस्ट २०१८ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा घेण्यात येत आहे. त्यानुसार **लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.**

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १. | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) | मंगळवार दिनांक १७/०७/२०१८ ते गुरुवार दिनांक ०२/०८/२०१८ |
| २. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) - सर्वसाधारण विषय | मंगळवार दिनांक १७/०७/२०१८ ते शनिवार दिनांक ०४/०८/२०१८ |
| ३. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) - व्यवसाय अभ्यासक्रम (नवीन) | मंगळवार दिनांक १७/०७/२०१८ ते गुरुवार दिनांक ०२/०८/२०१८ |

इ.१० वी व इ.१२ वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा **दिनांक ०९/०७/२०१८ ते दिनांक १६/०७/२०१८** या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दिनांक ११/०६/२०१८ पासून उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**<u>मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे विभागीय मंडळामार्फत छापील स्वरुपात दिलेलेच वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने किंवा खाजगी यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.</u>**

(डॉ.अशोक भोसले)<br>
प्र. सचिव,<br>
राज्यमंडळ, पुणे-४